|---|---|---|---|---|
| प्रारंभींची शिल्लक | १३८ | १४६ | १७२ | १४४ |
| उत्पादन | ५०० | ५५४ | ५१९ | ५१३ |
| एकूण पुरवठा | ६३८ | ७०० | ६९१ | ६५७ |
| खप | ४९२ | ५२८ | ५४७ | ५६८ |
| असेरची शिल्लक | १४६ | १७२ | १४४ | ८९ |

### भूशास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा अपुरा उपयोग

भारतांतील खनिज संपत्तीचा अजूनहि मोठ्या प्रमाणावर शोध घेण्यांत आलेला नाहीं. खनिज संपत्तीचें संशोधन करून करण्यांत आल्यास अजून कितीतरी पटीनें अधिक ती उपलब्ध होईल असें मानण्यांत येत आहे. पण त्याचबरोबर भारतांत उपलब्ध असलेल्या भूशास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा पुरा उपयोग करून घेतला जात नाहीं असें आढळून आलें आहे. कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेनें ह्यासंबंधीं नुकतीच एक पहाणी केली आहे. ह्या पहाणींत असें दिसून आलें कीं, देशांत उपलब्ध असलेल्या भूशास्त्रज्ञांपैकी १० टक्के शास्त्रज्ञ बेकार आहेत अगर त्यांना बिनतांत्रिक अथवा कारकुनी कामें देण्यांत आलेलीं आहेत. अशा बेकार भूशास्त्रज्ञांत ४० जण पदवीनंतरची परीक्षा पास झालेले असून त्यांपैकी बरेचसे पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झालेले आहेत. बिनतांत्रिक आणि कारकुनी काम करीत असलेल्या भूशास्त्रज्ञांची संख्या सुमारें १५० आहे. तेहि पदवीनंतरचा अभ्यासक्रम पार पाडलेले आहेत. इतके भूशास्त्रज्ञ बेकार असले तरी त्यांची संख्या जरूरीपेक्षा जास्त आहे असा त्याचा अर्थ नाहीं. तांत्रिक कौशल्य अंगीं असणाऱ्या माणसांचा उपयोग करून घेण्याची निश्चित योजना नसल्याचा हा परिणाम आहे. भारताच्या भूप्रदेशाच्या मानानें भूशास्त्रज्ञांची संख्या कमीच आहे. भारतांत दर ६६० चौरस मैलांमागें अवघा एक भूशास्त्रज्ञ उपलब्ध आहे; अमेरिकेंत दर चौरस मैलांमागें एक भूशास्त्रज्ञ आहे! शिवाय अमेरिका अगर रशिआ एका वर्षांत जेवढे भूशास्त्रज्ञ शिकवून तयार करील तेवढेहि एकूण आज भारतांत नाहींत.

### अंतराळांत प्रवास करणारी पहिली स्त्री

पृथ्वीभोंवतीं भ्रमण करणारीं आकाशयानें पाठवून अवकाशाविषयीं संशोधन करण्याचे कामांत रशिआ आणि अमेरिका ह्यांची स्पर्धा चालू आहे. १९६१ सालीं रशिआनें प्रथम युरी गागारिन ह्याला अग्निबाणांच्या साह्यानें पृथ्वीप्रदक्षिणा घडविली. त्यानंतर

त्वकरच अमेरिकेनेंहि अवकाशशास्त्रांत आपण फारसें मागें नसल्याचें दाखवून दिलें. आतां रशिआनें पुन्हां एकदा आघाडी मारली आहे. व्हॅलेंटिना टेरेशकोन्हा ह्या २६ वर्षांच्या तरुणीला रशिआनें आकाशयानांतून पृथ्वीप्रदक्षिणेला वर पाठविलें. अंतराळांत प्रवास करणारी पहिली स्त्री म्हणून तिचें नांव जगाच्या इतिहासांत अजरामर होईलच. गेल्या एकदोन शतकांत झालेल्या शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीमुळें मनुष्यसमाजाचें स्वरूपच पालटून गेलें आहे. जीं कामें अगर साहसें फक्त पुरुषानांच करण्यासारखीं म्हणून मानली गेली होती, तीं स्त्रियाहि उत्तम तऱ्हेनें करूं शकतील असा दावा स्त्रिया अगर त्यांचे कैवारी करीत असत. हा दावा खरा ठरल्याचें उघडच दिसत आहे. आधुनिक शास्त्रें व त्यांचा व्यावहारिक उपयोग ह्यांच्या बाबतींत पुरुषांची मक्तेदारी असण्याचें कारण नाहीं. स्त्रियांनाहि योग्य ते शिक्षण आणि संधि दिल्यास त्या ह्याहि क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेऊं शकतात हें रशिआच्या टेरेशकोव्हानें पुन्हा एकदा दाखवून दिलें आहे. अमेरिका इतक्यांतच अंतराळांतील भ्रमणास स्त्रीप्रवासी पाठवील असें नाहीं. तथापि, जें रशिआंतील एका स्त्रीला शक्य झालें तें अमेरिकन स्त्रीलाहि शक्य आहेच.

## चीनच्या धोक्याची जपानला जाणीव

आशिआ व पॅसिफिक महासागरांतील देशांत जपानचे राजप्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची परिषद टोकिओ येथें भरविण्यांत आली होती. भारतावर चीननें आक्रमण केल्यापासून भारताच्या वाढलेल्या अडचणींची जाणीव अधिकाऱ्यांनीं केलेल्या चर्चेत दिसून आली. भारताला स्वतःचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठीं जपाननें अधिक मदत केली पाहिजे अशा आशयाचे विचार परिषदेंत व्यक्त करण्यांत आले. दक्षिण आशिआ व आग्नेय आशियामधील देशांना चीनकडून धोका असल्यामुळें त्यांना अधिक आर्थिक मदत देऊन चीनला पायबंद घालण्याच्या कामीं जपानला पुष्कळसें करतां येण्यासारखें आहे असा परिषदेचा अभिप्राय पडला. ह्या वातावरणामुळें जपानकडून भारताला अधिक मदत मिळण्याची शक्यता आहे.

## लष्करासाठी खेचरांचें पैदास केंद्र

सिकिमच्या सरकारच्या सहकार्यानें भारत सरकार उत्तर सिकिममध्यें लष्कराला उपयोगी पडणाऱ्या खेचरांची पैदास करणारें एक केंद्र काढणार आहे. हें केंद्र ९,००० फूट उंचीवरील जागीं काढण्यांत येणार आहे. केंद्रांत पैदास करण्यांत येणारीं खेचरें १८,००० फूट उंचीपर्यंत सध्यां लष्करी मालाची वाहतूक करूं शकतील. खेचरांसाठी लागणाऱ्या तबेल्यासाठी १ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. शिवाय केंद्रांत एक संशोधनसंस्थाहि चालविण्यांत येणार आहे. अशाच प्रकारचें एक केंद्र लडाखमध्येंहि स्थापन करण्यांत येणार आहे. सायप्रसच्या सरकारनें भारताला अतिशय उंच ठिकाणीं जाणारीं खेचरें देऊं केलीं आहेत.

---

**चष्म्याच्या कांचांचा कारखाना**—नॅशनल इन्स्ट्रुमेंटस लि. ह्या सरकारी मालकीच्या कंपनीनें रशिआच्या साह्यानें चष्म्यांना लागणाऱ्या कांचा तयार करण्याचा कारखाना काढण्याचें निश्चित केलें आहे. रशिआनें भारताला १९५७ सालीं ५० कोटी रुबल्सचें कर्ज दिलेलें आहे. त्यांतून ह्या कारखान्याची उभारणी करण्यांत येणार आहे. १९६६ सालीं दुर्गापूर येथें कारखाना सुरू होईल व त्यांत रोज ३०० टन वजनाच्या कांचा तयार होतील.

## पृथ्वीची आंसाभोंवतालची गति वाढली होती

चालू वर्षाच्या आरंभीं पृथ्वीची स्वतःच्या आंसावर फिरण्याची गति नेहमींपेक्षा वाढली होती असा हिशोब एका जपानी शास्त्रज्ञानें केला आहे. टोकिओ येथील खगोल वेधशाळेच्या कालगणना विभागांत काम करणाऱ्या ह्या शास्त्रज्ञाच्या गणिताप्रमाणें ह्या वर्षाच्या जानेवारी ते मार्चच्या मध्यापर्यंत पृथ्वीला आपल्या आंसाभोंवतीं फिरण्यास पांचदहा हजारांश सेकंद कमी वेळ लागत होता. मार्चच्या मध्यानंतर मात्र पृथ्वीची गति नेहमींप्रमाणें झाली. पृथ्वीच्या गतींत हा फरक घडवून आणण्यासाठी जपानमधील सर्वांत मोठा पर्वत हवेंत भिरकावण्यासाठीं लागणाऱ्या शक्तीच्या १० पट शक्ति लागेल इतकें सूक्ष्म गणित त्यानें केलें आहे.

## अंतराळांत दांत घासतां येत नाहींत

रशियाच्या अंतराळ वीरांना असा अनुभव आला आहे कीं, पृथ्वीभोंवतालच्या परिभ्रमणांत वजनरहित अवस्थेमुळें दांत घासण्याच्या ब्रशाचा व दंतमंजनाचा उपयोग करतां येत नाहीं. म्हणून त्यांना गुळण्या करण्याचा अवलंब करावा लागतो. अंतराळ प्रवासांत वापरतां येण्यासारखीं खास दंतमंजनें आतां रशियांत तयार करण्यांत येणार आहेत. हीं दंतमंजनें गिळण्यास योग्य अशीं असतील. दांत घासण्यासाठी त्यांचा उपयोग केल्यावर यान चालविण्यारानें तीं सरळ गिळावयाचीं आहेत; दंतमंजनें स्वादिष्ट बनविण्यांत येणार असल्यानें गिळण्याच्या कामीं अडचण भासणार नाहीं.

## मॉस्को शहरांत भारताच्या मालाचें प्रदर्शन

जुलै महिन्यांत मॉस्को शहरांत भारतांत होणाऱ्या विविध प्रकारच्या मालाचें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत १,००० पेक्षा अधिक औद्योगिक व इतर व्यापारी संघटना भाग घेणार आहेत. परदेशांत भरविण्यांत आलेलें भारतीय मालाचें हें पहिलेंच प्रदर्शन आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून झालेली आर्थिक व इतर प्रगति दाखविण्याचा प्रदर्शनाचा हेतु आहे. प्रदर्शनाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला हे आहेत. रशिआच्या सहकार्यानें भारतांत उभारण्यांत आलेल्या औद्योगिक प्रकल्पांची कल्पना देणारा एक विभाग प्रदर्शनांत असेल. त्याशिवाय भारताच्या हस्तव्यवसायांची माहिती देणाराहि एक विभाग उघडण्यांत येणार आहे.

## यौगिक व्यायामाची सक्ती

जगप्रसिद्ध तंतुकार मि. येहुदी मेनुहिन लंडन येथें संगीताचें शिक्षण देणारें एक कॉलेज स्थापन करणार आहेत. ह्या कॉलेजमध्यें अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना यौगिक व्यायामाचें शिक्षण सक्तीचें करण्यांत येणार आहे. शिक्षण देण्यासाठी भारतांतील एक तज्ज्ञ नेण्यांत येणार आहे. संगीतसाधना यशस्वी होण्यासाठी योगाचा चांगला उपयोग होतो, असें मि. मेनुहिन ह्यांचें म्हणणें आहे.

---

**तांत्रिक शिक्षणाची सोय**—चालू पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस २०,००० विद्यार्थीना तांत्रिक शिक्षण देण्याची सोय करण्यात येणार आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालें त्या सुमारास अवघ्या ४,००० विद्यार्थीना असें शिक्षण देण्याची सोय उपलब्ध होती.

## सक्तीचीं डिपॉझिट योजना

सक्तीची डिपॉझिट योजना १ जुलै रोजीं अमलांत आली. १२,००० पोस्ट ऑफिसांतून ३० लक्ष लोकांच्या ठेवी स्वीकारण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ठेवीदारांची संख्या ५० लाखांपर्यंतहि वाढण्याची शक्यता आहे. इनकमटॅक्स भरणारांवरच स्वतःची ठेव बँकेंत किंवा पोस्टांत जाऊन भरण्याची जबाबदारी आहे. जे इनकमटॅक्स भरीत नाहींत, अशांच्या मालकांनीं ठेव वसूल करून तिचा भरणा करावयाचा आहे. नोकरांसाठीं केलेली योजना येथें देण्यांत येत आहे: —

या योजनेंतील बऱ्याच तरतुदी कर भरणाऱ्या व्यक्तींसाठी जी योजना आखली आहे, त्या सारख्याच आहेत. नोकरांसाठी खालीलप्रमाणें तीन प्रकार ठरविले आहेत.

( १ ) पगारापासून मिळणारें ज्याचें वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांपेक्षा कमी आहे.

( २ ) पगारापासून मिळणारे ज्याचे वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांवर आहे, परंतु जे इन्कमटॅक्स भरण्यास पात्र नाहींत.

( ३ ) जे इन्कमटॅक्स भरण्यास पात्र आहेत.

**वर्ग ( अ )**

पगारापासून मिळणारें ज्याचें वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांना ही योजना लागू होणार नाहीं व त्यांना डिपॉझिट भरावें लागणार नाहीं.

**वर्ग ( ब )**

पगारापासून मिळणारें ज्याचें वार्षिक उत्पन्न १५०० रुपये अगर त्याहून जास्त आहे, परंतु जे इन्कमटॅक्स भरण्यास पात्र नाहीत त्यांना वार्षिक उत्पन्नाच्या ३ टक्केप्रमाणें डिपॉझिटचा रक्कम भरावी लागेल. परंतु १९६३-६४ सालासाठी मात्र वार्षिक उत्पन्नाच्या २। टक्के या दराने रक्कम भरावी लागेल.

**"डिपॉझिटची माफी"**

जे नोकर स्वतःच्या, पतीच्या अगर पत्नीच्या आयुर्विम्याचा हप्ता, प्रॉव्हिडंड फंड ॲक्टाखाली येणाऱ्या फंडांत भरलेली रक्कम पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकेंतील १० वर्षांचे अगर १५ वर्षांचे ( क्युम्युलेटिव्ह टाईम डिपॉझिट खातें ) यांत वार्षिक पगाराच्या ११ टक्के इतकी रक्कम भरत असतील तर त्यास सक्तीची बचत योजनेमध्यें रक्कम गुंतविण्याची सक्ती नाही. यासाठी नोकराने आपल्या मालकास लेखी निवेदन एप्रिल महिन्याचा पगार मिळण्यापूर्वी दिलें पाहिजे. त्यामध्यें वरीलपैकीं तीनहि अथवा कोणत्याहि एका विभागात ११ टक्के एवढी रक्कम भरली आहे किंवा भरणार आहे, असें निवेदन दिलें पाहिजे.

अशा प्रकारें गुंतविलेली रक्कम ११ टक्यांपेक्षा कमी नसल्यास मालकानें सदर व्यक्तीच्या पगारांतून कोणतीहि रक्कम कापून घेऊं नये.

सन १९६३-६४ सालाकरितां अशा प्रकारचें निवेदन जुलै १९६३ चा पगार मिळण्यापूर्वी केलें तरी चालेल.

**" मालकांच्या जबाबदाऱ्या "**

डिपॉझिटची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी कायद्यानें मालकावर टाकलेली आहे. या बाबतींत त्यांचीं कर्तव्यें खालीलप्रमाणें आहेत.

( १ ) डिपॉझिट खातें उघडण्यासाठी प्रत्येक नोकराकडून फार्म ( अ ) नोकरांच्या नांवानें भरून तो डिपॉझिट ऑफिसकडे पाठविला पाहिजे. नोकर अज्ञान असल्यास फार्म ( अ ) मालकानें स्वतः भरून पाठवावा.

( २ ) फॉर्म ( अ ) व त्या सोबत डिपॉझिटची रक्कम व फॉर्म ( एफ ) च्या दोन प्रतीमध्यें कपात केलेल्या रकमेचा मजकूर भरून अधिकाऱ्याकडे पाठविल्या पाहिजेत.

( ३ ) नोकराच्या पगारांतून ३ टक्केप्रमाणें डिपॉझिटची रक्कम कापून घेतली पाहिजे.

( ४ ) प्रत्येक नोकराच्या नांवाचें पासबुक डिपॉझिट अधिकाऱ्याकडून त्यांत डिपॉझिट केलेल्या रकमेची नोंद करून घेऊन मिळविलें पाहिजे.

( ५ ) पुढील सर्व डिपॉझिटच्या रकमा व त्यासोबत फॉर्म ( एफ ) च्या दोन प्रती भरून डिपॉझिट अधिकाऱ्याकडे पाठविल्या पाहिजेत.

( ६ ) डिपॉझिटची रक्कम पगारांतून कापून घेतल्या तारखेपासून ती १४ दिवसांच्या आंत डिपॉझिट अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे. ( अ ) परंतु महिन्यांतून जर एकापेक्षा जास्त वेळेस पगार दिला जात असेल तर पगार कापलेल्या शेवटच्या दिवसापासून पुढे १४ दिवस मोजावेत. ( ब ) मार्च महिन्यांत केलेली कपात तो महिना संपण्याच्या आंत भरली पाहिजे.

( ७ ) पगारांतून कापून घेतलेली डिपॉझिटची रक्कम महिन्यांतून एकदा डिपॉझिट ऑफिसमध्यें भरता येईल. फक्त मार्च महिन्यांत दोन वेळां रक्कम पाठवितां येईल.

( ८ ) डिपॉझिट रोखीनें अगर चेकनें ज्या डिपॉझिट ऑफिसमध्यें व्यक्तीचें खातें असेल तेथें भरलें पाहिजे. ज्या ठिकाणीं क्लिअरिंग हाऊसच्या सवलती आहेत त्या ठिकाणीं फक्त चेकनें रक्कम पाठवितां येईल.

( ९ ) फॉर्म ( एफ ) ची एक प्रत डिपॉझिट अधिकाऱ्याकडून सही करून मिळविली पाहिजे.

( १० ) पास बुकें सांभाळून ठेविलीं पाहिजेत व ती नोकरांना सवडीप्रमाणें पाहावयास दिलीं पाहिजेत.

( ११ ) नोकर निवृत्त झाल्यास अगर नोकरी सोडून गेल्यास त्यास पास बुकें परत केलीं पाहिजेत. तो मृत्यु पावल्यास त्यानें नेमून दिलेल्या व्यक्तीस अगर वारसास पासबुकें परत केलीं पाहिजेत.

( १२ ) डिपॉझिट कापून घेतल्यासंबंधीचे सर्व कागदपत्र अधिकाऱ्यांना जरूर असेल तेव्हां हजर केले पाहिजेत.

( १३ ) ११ टक्क्यांच्यावर विमा हप्ते वगैरे भरत आहे म्हणून जर नोकरानें सूट मागितली तर मालकानें तसें लेखी निवेदन आपल्या नोकरांकडून एप्रिल महिन्याच्या पूर्वी घेतलें पाहिजे. तसें निवेदन दिल्यास मालकानें कपात करतां कामा नये.

( १४ ) सालअखेरीस दाखल्याप्रमाणें ११ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम विमा हप्ते वगैरे भरली आहे किंवा नाहीं तें तपासून पाहिलें पाहिजे.

( १५ ) सालअखेरीस भरलेली रक्कम ११ टक्क्यांपेक्षा कमी आहे, असें आढळून आल्यास त्या नोकराचे शेवटच्या महिन्याच्या पगारांतून डिपॉझिटची सर्व रक्कम कापून घेतली पाहिजे.

**" रक्कम कापून न घेतल्यास दंड "**

नोकर बचतीची रक्कम भरण्यास पात्र असतांहि जर मालकानें त्याच्या पगारांतून रक्कम कापून घेतली नाहीं तर तो गुन्हा होईल व त्यासाठीं दंड म्हणून नोकराचे पगाराची रक्कम धंद्यांतील खर्च म्हणून वजा मिळणार नाहीं.

**वर्ग ( क ) " इन्कमटॅक्स भरण्यास पात्र असलेल्या नोकरांचेबाबत "**

इन्कमटॅक्स भरणाऱ्या व्यक्ति आणि इन्कमटॅक्सला पात्र असलेले नोकर यांसाठी जरी दोन वेगवेगळ्या योजना केलेल्या असल्या तरी बहुतेक सारख्याच आहेत. अशा वर्गास ही सक्तीची बचत योजना सक्तीची नाहीं. परंतु त्यांनीं जर या योजनेमध्यें रक्कम गुंतविली तर त्यांना आकारणीच्या वेळीं डिपॉझिट स्कीमखालीं भरलेली रक्कम अगर ठरविलेल्या मर्यादेपर्यंतची रक्कम यांपैकी व जी कमी रक्कम असेल तितक्या रकमेएवढी जादा सरचार्जमधून सूट मिळेल.

**" नोकरांचीं कर्तव्यें "**

( १ ) ज्या नोकरांना जादा सरचार्जची माफी मिळवावयाची असेल त्यांनीं डिपॉझिट खातें उघडण्यासाठी फॉर्म ( अ ) भरून डिपॉझिट अधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे.

( २ ) डिपॉझिट ऑफीस त्याचे नांवाचें पासबुक तयार करून त्यास भरलेल्या रकमा नोंदवून नोकरास देईल.

( ३ ) डिपॉझिट रोखीनें अगर चेकनें भरलें पाहिजे.

( ४ ) प्रत्येक डिपॉझिट रकमेसाठी पावती ( ब ) मिळेल आणि १ रुपया फी भरून वेगळा दाखलाहि घेतां येईल.

( ५ ) वर्ष संपण्यापूर्वीं डिपॉझिट भरलेल्या सर्व रकमांचा अथवा भरावयाच्या रकमांचा तक्ता मालकाकडे पाठविला पाहिजे.

**" मालकाचें कर्तव्य "**

डिपॉझिट भरल्याबद्दलचा तक्ता नोकरानें पाठविल्यानंतर त्या नोकरास मालकानें जादा सरचार्जची डिपॉझिट म्हणून भरलेल्या रकमेएवढी अथवा पहिल्या ६००० रुपयांपर्यंत ३ टक्के व पुढील रकमेवर दोन टक्केप्रमाणें येणारी रक्कम ( यात जी कमी असेल ) एवढी सूट दिली पाहिजे.

**रक्कम परत देण्यासंबंधीं कोणत्याहि व्यक्तीस मान्यता देण्यासंबंधींचे नियम**

( १ ) फक्त व्यक्तीला नॉमिनेशन करण्याचा अधिकार आहे.

( २ ) एका किंवा जादा लोकांना नॉमिनेट करतां येईल. त्यांपैकी कोणी मयत झाल्यास राहिलेल्यांना रक्कम मिळेल.

( ३ ) व्यक्ति मयत झाल्यावर किंवा परत देण्याची मुदत संपल्यावर रक्कम परत मिळेल.

( ४ ) अज्ञानाच्या वतीनें भरलेल्या डिपॉझिटच्या बाबतींत नॉमिनेशन करतां येत नाहीं.

( ५ ) मान्यता असणारा अज्ञान असल्यास व रक्कम डिपॉझिट ठेवणारा अज्ञान सज्ञान होण्याच्यापूर्वींच मयत झाल्यास रक्कम घेण्यासाठी अन्य माणसास येतां येईल.

( ६ ) मान्यता ( डी ) फॉर्ममध्यें द्यावी लागते.

( ७ ) मान्यता बदलावयाची असल्यास अगर रद्द करावयाची असल्यास ( इ ) फॉर्म भरून डिपॉझिट ऑफिसला कळवावें.

( ८ ) मान्यतेमध्यें कोणताहि बदल केला अगर मान्यता रद्द केल्यास त्याची नोंद डिपॉझिट ऑफिसमध्यें करावी लागते. तसेंच याची नोंद पासबुकामध्यें करून घ्यावी लागते. आणि या फेरबदलाचा परिणाम सदर नोंद घेतल्यापासून अंमलांत येतो.

---

**बडोद्याजवळील तेलशुद्धीचा कारखाना** — गुजरात राज्यांत बडोद्याजवळ काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याच्या प्राथमिक कामाला लवकरच प्रारंभ करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी एक तात्पुरती वसाहत उभारण्यांत येत असून त्यांत १,००० कामगारांची राहण्याची सोय करण्यांत येईल. कारखान्याचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर त्यांत दरसाल १० लाख टन तेल शुद्ध करण्यांत येईल. १९६५ च्या मध्याच्या सुमारास दुप्पट तेल शुद्ध करण्यांत येऊं लागेल.

**रोज ५०० घड्याळांचें उत्पादन**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्याच्या घड्याळाच्या विभागांतून दररोज ५०० घड्याळें निर्माण करण्यांत येऊं लागलीं आहेत. १९६२–६३ सालांत ५१,५६२ घड्याळें आयात केलेल्या भागांच्या साह्यानें जुळविण्यांत आलीं. गेल्या जानेवारी महिन्यापासून घड्याळांचे कांहीं भाग कारखान्यांतच बनविण्यास प्रारंभ करण्यांत आला.

**खाजगी तेल कंपन्यांची मदत**—बर्मा शेल आणि एसो ह्या खाजगी तेल कंपन्यांनीं अंकलेश्वर तेलखाणी व कोयाली येथील तेल कारखाना ह्यांच्यापासून पुण्यापर्यंत तेलवाहू नळ घालण्याची तयारी दाखविली आहे. ह्या कामासाठी लागणारा परदेशीय चलनाचा खर्च करण्याची त्यांची सिद्धता आहे. मात्र त्यांच्या तेलशुद्धीच्या कारखान्याची उत्पादनक्षमता वाढवून मिळावी असें त्यांचें म्हणणें आहे.

**संततिनियमनाचा पुन्हा प्रचार**—चीनमधील अन्नधान्याचा तुटवडा सालोसाल वाढत चालल्यामुळें चीनच्या सरकारनें संततिनियमनाचा प्रचार पुन्हा चालू केला आहे. धान्याचें उत्पादन वाढण्याच्या आत्मविश्वासानें मध्यंतरीं संततिनियमनाचा प्रचार बंद करण्यांत आला होता. चीनची लोकसंख्या आतां ७० कोटींच्या घरांत असावी असा अंदाज आहे. दरसाल २ टक्क्यापेक्षाहि अधिक वेगाने चीनची लोकसंख्या वाढत आहे.

**प्राचीन गांवाचे अवशेष**—मध्य प्रदेशांतील सागर जिल्ह्यांत ख्रिस्तपूर्व २ हजार वर्षांपूर्वीच्या एक गांवाचे अवशेष शास्त्रज्ञांना सांपडले आहेत. गांवाचें रक्षण करण्यासाठी मातीचा तट आणि त्यांच्याभोंवतीं खंदक असावा असें गांवाच्या अवशेषावरून दिसतें. खंदकाची रुंदी १२० फूट व खोली १८ फूट आढळून आली.

**दुर्गापूर येथील झोतभट्टी**—दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यांत भारतामधील सर्वांत मोठी झोतभट्टी बांधण्यांत येणार आहे. हें काम एका ब्रिटिश कंपनीला मिळालें आहे. भट्टी बांधण्यासाठी ७० लाख पौंड खर्च येणार आहे. ती बांधून पुरी झाल्यावर दुर्गापूर येथील कारखान्याची उत्पादनक्षमता १० लाख टनांवरून १६ लाख टनांपर्यंत वाढेल.

**आर्थिक मदतींत कपात !**—चीन व रशिआ ह्यांच्यामध्यें क्रांतीच्या तत्त्वज्ञानाबद्दल सध्यां चाललेल्या वादांत उत्तर कोरिया चीनची बाजू घेत आहे. त्यामुळें कोरिआला रशिआकडून मिळत असलेल्या मदतींत कपात करण्यांत आली असावी असा अंदाज जाणकार निरीक्षक करीत आहेत. कारण, आंतरराष्ट्रीय राजकारणांत स्वातंत्र्य व समानता राखावयाची असेल तर कोरिआनें आपली अर्थव्यवस्था मजबूत बनविली पाहिजे, असे विचार कोरिआच्या राजधानींत व्यक्त करण्यांत येत आहेत.

**माधवाश्रम लि.** भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

बँकेच्या रविवार दि. २३ जून १९६३ रोजीं झालेल्या कार्यकारी मंडळाच्या फेरनिवडणुकींत सन १९६२-६३ च्या राहिलेल्या वर्षाकरितां पुन्हां पूर्वींचेच सभासद निवडून आले. त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें—

(१) मा. भणगे गं. मो. बी. ए., बी. टी., कार्याध्यक्ष. (२) मा. मोघे अ. दा. बी. ए., उपकार्याध्यक्ष. (३) मा. भट रा. द. बी. ए, एल. एस. जी. डी., (४) मा. देशपांडे स. स. एम. ए., (५) मा. महाजन ह. गो. (६) मा. देव द. ग. (७) मा. सौ. हर्डीकर आशा वि. (८) मा. कुलकर्णी मो. वि. बी. ए. (९) मा. दिवाकर शं. वि. एलएल. बी. (१०) मा. पाटसकर द. मो. (११) मा. भागवत स. ब.

महाराष्ट्र राज्य को-ऑप. ट्रॅब्युनलचे श्री. राजाराम सावळाराम देशपांडे यांचें अपील नं. २८५-६२ चे कामीं हुकूम केल्याप्रमाणें सदरची फेरनिवडणूक घेण्यांत आली होती.

---

### राडारच्या साधनांसाठी जपानचें साह्य

उत्तर सरहद्दीवर होऊं शकणाऱ्या चिनी विमानहल्ल्याला तोंड देण्यासाठी भारताला विमानांच्या आगमनाचा इषारा देणाऱ्या राडारच्या साधनांची फार गरज आहे. त्यांपैकीं कांहीं साधनें पश्चिम युरोपमधील देश देऊं शकतील. परंतु बरीचशीं देशांतच तयार करून घ्यावीं लागतील. टोकिओमधील एका कंपनीनें राडारच्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व तंत्रज्ञ पुरविण्याचें मान्य केलें आहे. ह्या बाबतींत सध्यां वाटाघाटी चालू आहेत. कारखान्याच्या प्राथमिक अवस्थेंत राडार जुळविण्याचें कामच करण्यांत येईल. संकल्पित कारखाना उभारण्यासाठी १ कोटी डॉलर्स (४·८०) कोटी रुपये लागतील.

---

### भाताच्या नमुनेदार शेतांसाठी साह्य

मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं टोकिओमध्यें असतांना जपानच्या शेतकी मंत्र्यांची भेट घेऊन जपानी पद्धतीनें भातशेती करणारी निदान शंभर नमुनेदार शेतें भारतांत असावीं अशी इच्छा व्यक्त केली. सध्यां अशीं ४ शेतें जपानी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यांत येत आहेत. भारतामधील भातशेतीचें दर एकरीं सरासरी पीक सुमारें १,००० पौंड आहे. जपानी पद्धतीनें भातशेती केल्यास पीक दुप्पट येईल अशी अपेक्षा आहे. भारतामधील प्रत्येक भातशेतीच्या विभागांत एक नमुनेदार शेत स्थापन करण्याच्या कामीं जपानकडून साह्य मिळण्याची शक्यता आहे.

---

### पश्चिम बंगाल–आसाममधील रस्तावाहतूक

पश्चिम बंगाल व आसाम ह्या राज्यांतील मालवाहतुकीची व्यवस्था अधिक कार्यक्षम व्हावी म्हणून मध्यवर्ती सरकार नवीन रस्ते बांधण्याचें काम मोठ्या प्रमाणावर करणार आहे. हें काम करण्यासाठी स्वतंत्र कॉर्पोरेशनच स्थापन करण्यांत येण्याचा संभव आहे. कांहीं महिन्यांपूर्वीं ब्रह्मपुत्रा नदीवर वाहतूक करणाऱ्या बोटकंपन्यांच्या खलाशांनीं संप केला होता. त्यामुळें आसाम व पश्चिम बंगालमधील वाहतूक थंडावण्याच्या मार्गावर होती. उभयतां राज्यांतील वहातूक नीट चालावी म्हणून पर्यायी व्यवस्था करण्याची कल्पना त्यावेळीं निघाली होती चिनी आक्रमणाच्या वेळीं पर्यायी योजनेचा अभाव चांगलाच जाणवला.

---

### ऑस्ट्रेलिअन संघटनेची मदत

ऑस्ट्रेलिआंत 'कम्युनिटी एड अॅब्रॉड' ह्या नांवाची एक संघटना आहे. संघटनेचा उद्देश जगांतील दारिद्र्य नाहींसें करण्याचा आहे. ह्या संघटनेतर्फे भारतामधील २६ विकासाच्या कामांना मदत मिळालेली आहे. बहुतेक मदत भारतामधील ग्रामीण भागालाच देण्यांत आलेली आहे. खेडेगांवांतच इस्पितळें बांधणें, विहिरी खोदणें इत्यादि कामांसाठी मदतीचा विनियोग होत असतो. दार्जिलिंग येथें तिबेटी मुलांसाठी एक शाळा संघटनेतर्फे स्थापन करण्यांत आली आहे. खेडेगांवांतील विकास-योजनांसाठी संघटनेतर्फे आतांपर्यंत २ लाख रुपये दिले आहेत. मदत देण्यांत यावयाच्या योजना संघटना चौकशी करून निवडते.

---

### वनस्पति धनाचा अज्ञात ठेवा

हिंदमधील औषधी वनस्पतींचा विकास घडवून आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वैज्ञानिक व शास्त्रीय उपसंघटनेनें डॉ. फॉसबर्ग ह्या वनस्पति शास्त्रज्ञाला पाठविले होते. भारताच्या वनस्पतीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं देशांतील दोनतृतियांश वनस्पति बाहेरच्या वनस्पतिशास्त्रज्ञांना माहीतहि नाहींत. औषधी वनस्पतींचा विकास करण्याच्या कामीं भारताला अजून पुष्कळ काम करावयाचें आहे. पण ह्या बाबतींत परदेशीय चलन, इमारती, वाचनालयें, प्रयोगसाधनें, इत्यादि सर्वांचीच टंचाई आहे. भारतामधील औषधी वनस्पतींचा व्यवस्थित शोध केल्यास अनेक नव्या औषधांची प्राप्ति होऊं शकेल आणि त्यामुळें ज्या गंभीर स्वरुपाच्या विकारावर हल्लीं उपाय नाहींत ते विकार बरे करतां येतील.

---

### मध्यपूर्वेतील देशांकडून चीनला तेल ?

मध्यपूर्वेतील कांहीं अरब देश चीनला तेल विकण्याचा विचार करीत आहेत. ह्या देशांतील तेलाच्या खाणी परदेशीय कंपन्यांकडून चालविल्या जातात व उपसल्या जाणाऱ्या तेलावर त्या त्या देशाला रॉयल्टी देण्यांत येते. ही रॉयल्टी कांहीं प्रमाणांत तेलाच्या रूपांत घेण्याचा अधिकार अरब देशांना आहे. त्याचा उपयोग करून चीनला अगर इतर कोणत्याहि देशाला तेल विकतां येणें शक्य आहे. खुद्द चीनमध्यें परदेशीय तेलकंपन्यांचे कांहींहि व्यवहार होत नाहींत. त्यामुळें चीनला कंपन्यांकडून तेल मिळण्याची शक्यता नाहीं. चीन व रशिया ह्यांच्यांतील राजकीय संबंध सध्यां दुरावलेले असल्यामुळें तेलासाठी रशियावर अवलंबून राहाणें चीनला अडचणीचें वाटत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## रशियाकडून शस्त्रास्त्रें मिळविण्याचा प्रयत्न

गेल्या वर्षाच्या आक्टोबर–नोव्हेंबरमध्यें चीननें भारताच्या उत्तर सरहद्दीवर प्रचंड प्रमाणावर लष्करी आक्रमण केलें. त्या वेळीं भारत सरकारनें ब्रिटन-अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांबरोबरच रशियाकडेहि संरक्षणासाठी लागणाऱ्या शस्त्रास्त्रांबद्दल विचारणा केली होती; परंतु त्या वेळीं रशिआनें भारताच्या विचारणेकडे लक्ष दिलें नाहीं. गेल्या कांहीं आठवड्यांत मात्र भारताच्या गरजा भागविण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. कोणतीं शस्त्रास्त्रें किती प्रमाणांत पुरवूं शकूं ह्याची माहितीहि भारताला पुरविण्यांत आली आहे. कांहीं शस्त्रसामग्रीच्या किंमतीहि आगाऊ कळविण्यांत आल्या आहेत. भारताच्या चीनबरोबर चाललेल्या झगड्यांत हवाई सामर्थ्याचा तोकडेपणा विशेष जाणवत आहे. विमानांच्या हल्ल्यापासून रक्षण करण्यासाठी लागणारीं जमिनीवरून हवेंत सोडण्याचीं क्षेपणास्त्रें देण्याची तयारीहि रशिआनें दाखविली आहे. राशिआकडून मिळू शकणाऱ्या शस्त्रास्त्रांसंबंधीं तांत्रिक चर्चा करण्यासाठी भारतीय लष्कराचें प्रतिनिधीमंडळ ५ जुलै रोजीं मॉस्कोला जाणार आहे. त्यानंतर एका आठवड्यानें संरक्षणखात्याचे चिटणीस श्री. भूतलिंगम वाटाघाटी करण्यासाठीं जातील. ५ जुलै ह्या तारखेला सद्यःपरिस्थितींत महत्त्व आलेलें आहे. कारण, त्याच दिवशीं कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील मतभेदांची चर्चा चीनबरोबर मॉस्कोला सुरू होणार आहे. एकीकडे चीनशीं तात्त्विक काथ्याकूट करत असतांच भारताला शस्त्रास्त्रें पुरविण्याचीं बोलणीं चालू करण्यांत रशिआचा चीनला इषारा देण्याचा हेतु असावा असा तर्क जाणकार निरीक्षक करीत आहेत.

---

## रेवामधील पांढऱ्या वाघांचा प्रश्न सुटला

सार्वजानिक संस्थांतील अगर कंपन्यांच्या कारभारांतील एखाद्या अनावश्यक खर्चाच्या बाबीवर टीका करावयाची झाल्यास त्या बाबीला पांढऱ्या हत्तीची उपमा दिली जाते. रेवा संस्थान विलीन झाल्यावर त्यामधील हत्तींचें काय झालें तें माहीत नाहीं. परंतु तेथील महाराजांनीं मोठ्या हौसेनें पैदास केलेले पांढरे वाघ मात्र त्यांना पांढऱ्या हत्तींसारखे भासूं लागले. ह्या वाघांच्या योगक्षेमाचा खर्च त्यांना परवडेना म्हणून ते भारत सरकारनें विकत घ्यावे अशी सूचना त्यांनीं केली होती. परंतु सौदा किंमतीच्या मुद्यावर अडला. पांढरे वाघ हे दुर्मिळ असल्यामुळें ते परदेशांना निर्यात करण्याची परवानगीहि मिळेना. असा हा प्रश्न मोठ्या अडचणीचा झाला होता, त्यामुळें सर्व वाघ जंगलांत सोडण्याचा आपला विचारहि महाराजांनीं व्यक्त केला होता. पण आतां वाघांचें नशीब उघडलें आहे. एकूण आठ वाघांपैकीं चार वाघ महाराजांनीं दिल्ली येथील प्राणिसंग्रहालयाला भेट म्हणून दिले. आणखी दोन वाघ ब्रिट्रोल येथील प्राणिसंग्रहालयानें १ लाख रुपये देऊन विकत घेतले आहेत. त्यांना विमानानें ब्रिटनला पाठविण्यांत आले. १९१४ सालीं त्यावेळच्या रेवाच्या महाराजांनीं एक पांढरा वाघ पकडला होता पण तो ६ महिन्यांच्या अवधींत मरण पावला. त्याला पकडण्यासाठी ९०० शिपायांना वर्षभर खटपट करावी लागली होती. सध्यां असलेल्या पांढऱ्या वाघांचा पूर्वज १९५१ सालीं रेवाच्या जंगलांत सांपडला. त्याची पिवळ्या वाघिणीशीं जोडी लावून दुसऱ्या पिढीला प्रथम ४ पांढरीं वाघाचीं पिलें पैदा करण्यांत आलीं. ह्या वाघांचे डोळे निळे असून अंगावरील पट्टे करडे आहेत; काळे नाहींत.

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स

ह्या संस्थेचे आतां २८,००० सभासद आहेत. चालू वर्षीं २२,००० उमेदवार इन्स्टिटयूटच्या परीक्षांना बसले होते; १९६२ सालीं त्यांची संख्या १९,६२२ आणि १९६१ सालीं १६,२०० होती. देशांतील बँकिंगच्या वाढीला धरूनच ही वाढ आहे. सभासदांसाठी इन्स्टिटयूटनें गेल्या वर्षी १८ केंद्रांत व्याख्यानांची व्यवस्था केली; परंतु परीक्षार्थी उमेदवारांसाठी प्रत्यक्ष शिक्षणाची व्यवस्था करण्याचा विचार चालू आहे. प्रथम मुंबईला क्लासेस सुरू होतील आणि पहिल्या भागांतील विषय शिकविले जातील. अनुभव येईल त्याप्रमाणें दुसऱ्या भागाचें शिक्षण सुरू केलें जाईल आणि शक्य तितक्या केंद्रांत कालांतरानें क्लासेस काढले जातील. सभासदांना इन्स्टिटयूटचें जर्नल विनामूल्य मिळतें; कागद व छपाई ह्यांच्या महर्गतेस तोंड देण्यासाठी सभासदत्वाची वर्गणी पूर्वीप्रमाणें वार्षिक रु. ५ केली जाईल; सध्यां ती रु. २·५० आहे.

---

## सक्तीच्या ठेवी स्वीकारण्याचा सात बँकांना अधिकार

सक्तीच्या डिपॉझिट योजनेखाली १ ऑगस्टपासून रकमा जमा करण्याचा अधिकार सरकारनें सात शिड्यूल्ड बँकांना दिला आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बरोडा, युनायटेड कमर्शिअल बँक, बँक ऑफ इंडिया, देवकरण नानजी बँकिंग कंपनी आणि युनायटेड बँक ऑफ इंडिया, ह्या त्या बँका होत.

---

## परदेशी टपालाचे वाढलेले दर

१ जुलैपासून परदेशी टपालाचे दर वाढले आहेत. सिलोन, नेपाळ आणि पाकिस्तान ह्यांना पूर्वीचेच, अंतर्गत टपालाचे दर चालू राहातील. २० ग्रॅम्सपर्यंतच्या पत्रांना ४० न. पै. आणि पुढील प्रत्येक २० ग्रॅम्सला २५ न. पै. पडतील. पोस्टकार्ड सिंगल २५ न. पै. आणि रिप्लायपेड ५० न. पै. झाले आहे. बुकपोस्टाला पहिल्या ५० ग्रॅम्सला १५ न. पै. आणि पुढें प्रत्येक ५० ग्रॅम्सला १० न. पै. पडतील.

---

## बँकिंग : पब्लिक युटिलिटि सर्व्हिस

भारत सरकारनें इंडस्ट्रिअल डिस्प्युट्स ॲक्ट १९४७ खालीं बँकिंगचा व्यवसाय 'पब्लिक युटिलिटि सर्व्हिस' म्हणून जाहीर केला आहे. सहा महिनेपर्यंत त्याची मुदत आहे.

---

## युद्धजन्य हानीचा विमा : दर आणखी उतरले

युद्धामुळें माल व कारखाने यांच्या होणाऱ्या नुकसानीच्या विम्याच्या हप्त्याचे १ जुलै, १९६३ पासूनच्या तिमाहीचे दर जाहीर करण्यांत आलेले आहेत. तदनुसार इमर्जन्सी रिस्क (गुडस) योजनेखाली मालाच्या नुकसानीच्या विम्याच्या हप्त्याचा दर शंभर रुपयांस साडेसात नये पैसे आणि इमर्जन्सी रिस्क (फॅक्टरीज) योजनेखाली कारखान्यांच्या व इतर यंत्रसामग्रीच्या नुकसानीच्या विम्याच्या हप्त्याचा दर शंभर रुपयांस सव्वा अकरा नये पैसे राहील. डिसेंबर १९६२ मध्यें ही योजना जारी करण्यांत आल्यापासून हे दर दुसऱ्यांदा कमी करण्यांत आले आहेत. पहिल्या तिमाहींत हे दर अनुक्रमें १५ व २५ नये पैसे होते आणि दुसऱ्या तिमाहींत हे दर १० आणि १५ नये पैसे असे होते.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.